Exh.1/B

किरकोळ दिवाणी अर्ज- 128 / 2026

**मे.जिल्हा न्यायाधीशसो कोल्हापूर यांचे कोर्टात.**

१. श्री.राजाराम अंतू चौगुले
व.व - 45 धंदा – शेती
रा.कोयना कॉलनी गांधीनगर
ता-करवीर जि- कोल्हापूर — वादी
२. सौ.माया राजाराम चौगुले
व.व – 40 धंदा – गृहिणी
रा.कोयना कॉलनी गांधीनगर
ता-करवीर जि- कोल्हापूर

विरुद्ध

१. कर्मवीर भाऊराव पाटील मल्टीस्टेट
कॉ.ऑप,सोसायटी ली.जयसिंगपूर तर्फे
शाखा अधिकारी - वळीवडे
२. श्री.प्रकाश हरिभाऊ धुमाळ
व.व - 45 धंदा – खाजगी नोकरी
रा.कोयना कॉलनी गांधीनगर
ता-करवीर जि- कोल्हापूर — प्रतिवादी
३. श्री.संभाजी राजाराम आवटे
व.व - 45 धंदा – खाजगी नोकरी
रा. यळगुड ता- हातकणंगले
जि- कोल्हापूर

Order
Issue notice to Opponent
ASHISH MANOHAR PATIL
Digitally signed by ASHISH MANOHAR PATIL
Date: 2026.07.02 16:53:32 +0530
PDJ, Kolhapur
02/07/2026

**लवाद आणि सलग्नीकरण अधिनियम १९६६ च्या कलम ३४ अन्वये लवाद निवाडा अर्ज 107/2025 च्या अर्जास स्थगिती मिळणेकरिता अर्ज.**

**यातील वादी तर्फे अर्ज असा कि**

१. यातील वादी यांनी प्रतिवादी नंबर १ यांचे विरुद्ध लवाद निवाडा अर्ज १०७/२०२५ च्या अर्जास स्थगिती मिळणेकरिता कलम ३४ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

Superintendent (Lit.)
District Court, Kolhapur

२. यातील प्रतिवादी नंबर १ यांचा लवाद अर्ज हा एकतर्फी असून वादी यांना योग्य समन्स किव्हा नोटीस बजावणी न करता यातील प्रतिवादी नंबर १ यांनी निकाली काढला आहे.

३. यातील वादी यांनी प्रतिवादी नंबर १ यांचे संस्थेकडून घेतलेल्या कर्जास जमीनदार म्हणून प्रतिवादी नंबर २ व ३ असून सदर कामी यातील प्रतिवादी नंबर २ व ३ यांना **ESSENSIAL OF PARTY** म्हणून समाविष्ट करण्यात आलेले आहे.

४. यातील वादी यांनी प्रतिवादी नंबर १ यांचे संस्थेकडून दिनांक १३/०४/२०१८ ई रोजी ५,००,०००/- ( पाच लाख रुपये ) इतके कर्ज घेतलेले होते व आहे.

५. सदरचे कर्ज घेतले नंतर यातील वादी यांनी प्रतिवादी यांचे वेळोवेळी म्हणजेच त्यांचे खातेउतार ( STATEMENT ) आजतागायत 5,,58,501/- इतकी रक्कम प्रतिवादी नंबर १ यांचेकडे भरलेली होती व आहे.

६. यातील वादी यांनी प्रतिवादी नंबर १ यांना त्यांनी आकारलेल्या रकमेबाबत अनेकवेळा लेखी आणि तोंडी कळवून देखील यातील प्रतिवादी नंबर १ यांनी त्यांचा उद्देश साध्य करण्यासाठी जलदगतीने लवाद अर्ज निकाली काढलेला आहे.

७. यातील प्रतिवादी नंबर १ यांनी त्यांचे लवाद अर्ज निकाली काढून वादी यांचे कर्ज अजूनही २,१७,९२८/- इतकी शिल्लक रक्कम आहे असे दाखविले आहे.

८. यातील प्रतिवादी नंबर १ हे बेकायदेशीर निवाडाप्रक्रिया अमलात आणून तसेच चुकीच्या पद्धतीने व्याज आणि दंड आकारणी करून यातील वादी यांचा स्थावर आणि जंगम मालमत्तेवर जप्ती आणण्याचा किव्हा वसुली करण्याची शक्यता/ प्रयत्न आहे.

९. प्रतिवादी नंबर १ यांची बेकायदेशीर असून यातील वादी यांना कोणतीही पूर्वसूचना न देता ex-party आणि नैसर्गिक न्याय तत्वांचा भंग करून यातील प्रतिवादी नंबर १ यांनी सदरची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

१०. यातील प्रतिवादी नंबर १ याचा निवाड्याचा अर्जास तत्काळ स्थगिती मिळाली नाही तर यातील वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे.

११. यातील प्रतिवादी नंबर १ यांनी निवडा अर्जामध्ये २% दंड आणि 12% व्याज अशी एकूण आकारणी 14% केलेली असून सदरची आकारणी हि रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वाच्या विरुद्ध असून अत्यंत जुलमी आहे.

Superintendent (Lit.)
District Court, Kolhapur

१२. यातील प्रतिवादी नंबर १ यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर आणि जुलमी स्वरुअचे असून यातील प्रतिवादी नंबर १ हे वादी यांचा विरुद्ध वादी यांना कोणतीही पूर्वसूचना न देता ex-party आणि नैसर्गिक न्याय तत्वांचा भंग करून यातील प्रतिवादी नंबर १ यांनी सदरची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे तसेच वादी यांचेविरुद्ध झालेला EX-PARTY आदेश वादी यांना मान्य नसून यातील वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नंबर १ यांचेविरुद्ध दाखल केलेला आहे.

१३. दावेस कारण –

**सदर दाव्यास कारण असे कि, यातील प्रतिवादी नंबर १ यांनी वादी यांचेविरुद्ध लवाद प्रक्रिया सुरु करून मा.लवाद अधिकाऱ्यामार्फत दिनांक १७/०४/२०२६ ई रोजीई रोजी अन्यायकारक व कायद्याच्या तरतुदींना विरोध असा लवाद निर्णय प्राप्त केला आहे. सदर लवाद निर्णय हा वादी यांना योग्य संधी न देता रक्कम रुपये २,१७,९२८/- वसूल करणेचा नैसर्गिक न्याय तत्वाचा भंग करून व वस्तूस्थितीचा योग्य विचार न करता दिला असल्याने तो रद्द होणे आवश्यक आहे. सदर कारण दिनांक १७/०४/२०२६ ई रोजी प्रथम निर्माण झालेले आहे त्यानंतर ते आजतागायत चालू आहे.**

**१४. दावेची आकारणी –**

**सदरचा दाव्यास योग्य तो कोर्ट फि स्टंप लावलेला आहे.**

**१५. मुदत –**

**सदरचा दावा हा मुदतीत आहे.**

**१६. अधिकार क्षेत्र –**

लवाद प्रक्रिया जयसिंगपूर जि( कोल्हापूर ) येथे पार पडली असल्याने तसेच यातील प्रतिवादी नंबर १ यांची शाखा कोल्हापूर हद्दीत येत असून सदर प्रकरणाचा व्यवहार हा गांधीनगर कोल्हापूर हद्दीत झालेलाअसून सदरचा प्रकरणाचा न्याय निवडा करण्याचा अधिकार मा.न्यायालयास आहे.

Superintendent (Lit.)
District Court, Kolhapur

१७. यातील वादी तर्फे विनंती कि,

१. यातील प्रतिवादी नंबर १ यांनी दिनांक १७/०४/२०२६ ई रोजीचा लवाद अर्ज लवाद आणि सलग्नीकरण अधिनियम १९६६ च्या कलम ३४ अन्वये set aside करावा.
२. सदर अर्जाच्या अंतिम निकाला पावेतो लवाद निवाड्याच्या अंमलबजावणीस (stay) स्थगिती मिळावी.
३. यातील प्रतिवादी नंबर १ यांचेकडून तर्फे तत्सम अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारे वसुली ,जप्ती अथवा स्थावर जंगम मालमत्तेवर कोणतीही कारवाई होवू नये अशी कायम मनाई ताकीद होऊन मिळावी.
४. वरील कलमातील प्रार्थिलेप्रमाणे यातील प्रतिवादी नंबर १ यांचे विरुद्ध सदर अर्जाचे निकाला पावेतो तूर्तातूर्त मनाई ताकीद व्हावी हि विनंती.
५. जरूर तर वादी यांना दावा दुरुस्तीस परवानगी मिळावी.
६. अन्य न्यायाचे हुकुम वादी यांचे वतीने मंजूर करणेत यावे.
७. या दाव्याचा कोर्ट खर्च प्रतिवादी यांचेकडून वसूल होऊन वादी यांना देनेबाबत योग्य तो हुकुम व्हावा.

येणेप्रमाणे दावा असे.

Drafted & Presented by
Adv. N.D. Pawar

कोल्हापूर
ता. २४/०४/२६

मे.जा.व्हावे.

M.R. Chougle.

प्रतिज्ञा

मी यातील वादी श्री.राजाराम अंतू चौगुले व.व - 45 धंदा – शेती रा.कोयना कॉलनी गांधीनगर ता-करवीर जि- कोल्हापूर सत्य प्रतिज्ञा करतो कि, वरील दावेतील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा असे.

कोल्हापूर
ता २४/०४/२६

Superintendent (Lit.)
District Court, Kolhapur

## ॲफिडेव्हीट

मी यातील मी यातील वादी श्री. राजाराम अंतू चौगुले, व.व. 45, धंदा: शेती, रा. कोयना कॉलनी, गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर शपथेवर कथन करतो की, वरील अर्जातील मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट.

कोल्हापूर.

ता. 15/05/2026

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो,

(signature)

ॲड.निलेश ज्ञानू पवार

(signature)

## प्रतिज्ञा

मी यातील मी यातील वादी श्री. राजाराम अंतू चौगुले, व.व. 45, धंदा: शेती, रा. कोयना कॉलनी, गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

कोल्हापूर.

ता. 15/05/2026

(signature)

Solemnly Affirmed before me by
Shri... Rajaram-Antu chougule
of... Gandhinagar, Kolhapur who is
identified by Shri... N.N. Pawar Adv.
............whom I know personally
Dated :- 15.5.26

(signature)
Superintendent